**ठळक बातम्या**

- विशेष बाब म्हणून यंदाच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला ४ कोटी रुपये देण्याचा राज्य सरकारचा निर्णय
- बनावट कागदपत्रांच्या आधारे मुख्यमंत्री कोट्यातली सदनिका घेतल्याप्रकरणी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना २ वर्षांची शिक्षा, विरोधकांकडून राजीनाम्याची मागणी
- राज्य शिक्षण मंडळाची दहावीची परीक्षा उद्यापासून
- मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर ५६ कोटी रुपयांच्या गांजासह ५ जणांना अटक

**आणि**

- आयसीसी चँपियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत बांगलादेशाचं भारतापुढं विजयासाठी २२९ धावांचं लक्ष्य

**<><><><><>**

९८ वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन उद्यापासून दिल्लीत सुरु होत आहे. डॉ. तारा भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या संमेलनाचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित असतील. दिल्लीतल्या तालकटोरा क्रीडा संकुलात उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरीत तीन दिवस चालणाऱ्या या संमेलनात,

मान्यवरांच्या मुलाखती, बहुभाषिक कवी संमेलन, विविध विषयावर परिसंवाद, आदी कार्यक्रम होणार आहेत.

राज्य सरकारनं उद्यापासून या संमेलनाला एकूण ४ कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय घेतला आहे. दरवर्षी साहित्य संमेलनासाठी २ कोटी रुपये दिले जातात. मात्र या संमेलनाचं उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याहस्ते होणार आहे. साहित्यिक आणि साहित्य रसिकांवरचा वाढलेला खर्च, संमेलनाचं वेगळेपण यासारख्या कारणांमुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संमेलनासाठी अतिरीक्त २ कोटी रुपये द्यायला विशेष बाब म्हणून मंजुरी दिली.

**<><><><><>**

राज्याचे कृषिमंत्री आणि सिन्नरचे आमदार माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू शिवाजी कोकाटे यांना नाशिकमधल्या न्यायालयानं २ वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. याप्रकरणी न्यायालयांना दोघांनाही जामीन मंजूर केला आहे.

सुमारे २० वर्षांपूर्वी खोटी कागदपत्रे देऊन मुख्यमंत्री कोट्यातली सदनिका घेतली. अन्य दोन लाभार्थ्यांच्या सदनिकाही नावावर करुन घेतल्याची तक्रार माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी केला होता. त्याप्रकरणी ही शिक्षा झाली आहे. दिघोळे यांनी राजकीय वैमनस्यातून तक्रार दाखल केली होती. याप्रकरणी जिल्हा सत्र न्यायालयात दाद मागणार असल्याचे कोकाटे माध्यमांशी बोलताना सांगितले.

याप्रकरणी कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांनी केली आहे. आता कोकाटेंवर गुन्हा सिद्ध होऊ द्या असं अजित पवार आता म्हणू शकणार

नाहीत, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी केला आहे. शेतकऱ्यांच्या नावावर माजी कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी भ्रष्टाचाराच्या सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. आता माणिकराव कोकाटे यांना न्यायालयानं दोन वर्षांची शिक्षा ठोठावली आहे. या दोघांना मंत्रीमंडळातून बरखास्त करावं,अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

कोकाटे या निकालाला आव्हान देणार आहेत. त्यामुळं त्याला स्थगिती मिळेल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुलात मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी दोन स्वतंत्र वसतीगृहं आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची स्थापना केली जाईल, अशी घोषणा केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांनी केली आहे. मुंबई विद्यापिठात आयोजित संविधान अमृत महोत्सव कार्यक्रमात ते बोलत होते. हे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र माता रमाबाई आंबेडकर यांच्या नावानं ओळखलं जाईल, असं त्यांनी सांगितलं. मुंबई विद्यापिठातल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्रात प्राध्यापक आणि संशोधक पदांना मान्यता दिली जाईल, असंही ते म्हणाले. राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यावेळी उपस्थित होते.

केंद्र शासनाच्या ‘नमस्ते’ योजनेअंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना पीपीई किट, म्हणजे सुरक्षाविषयक उपकरणांचा संच तसंच ‘आयुष्मान कार्ड’चं वितरण आज डॉ. वीरेंद्र कुमार यांच्या हस्ते

करण्यात आलं. 'नमस्ते' योजनेअंतर्गत मुंबईत २ हजार ४८४ स्वच्छता कर्मचाऱ्यांची नोंदणी झाली आहे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर देशभरात ही योजना प्रभावीपणे राबवणार, अशी घोषणा त्यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

मुंबईत आज ग्रीन शिपिंग परिषद झाली. समुद्रात होणारं प्रदुषण कमी करण्यावर याचा भर होता. आंतरराष्ट्रीय सागरी संघटनेचे महासचिव आर्सेनिओ डॉमनिग्ज आणि केंद्रीय जलमार्ग राज्यमंत्री शंतनू ठाकूर यावेळी उपस्थित होते. कार्बन उत्सर्जन कमी करण्यावर भारताचा भर आहे, असं ते यावेळी म्हणाले. सर्वांनी सागरी संरक्षणासाठी पुढाकार घ्यावा, असं आवाहन डॉमनिग्झ यांनी केलं.

**<><><><><>**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावीच्या लेखी परीक्षेला उद्यापासून सुरुवात होत आहे. यंदा राज्यातल्या 5 हजार 130 मुख्य केंद्रावर परीक्षा होत असून 16 लाख 11 हजार 610 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. गेल्या वर्षीप्रमाणे याही वर्षी निर्धारित वेळेनंतर 10 मिनिटे वेळ वाढवून देण्यात येणार असल्याचं मंडळानं कळवलं आहे.

**<><><><><>**

मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर काल सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी ५ प्रवाशांकडून ५६ किलो २६० ग्रॅम वजनाचा गांजा गांजा जप्त केला. या गांजाची किंमत अंदाजे ५६ कोटी २६ लाख रुपये इतकी आहे. हे पाचही प्रवासी बँकाकहून मुंबईला आले होते. त्यांना अटक करण्यात आली आहे.

**<><><><><>**

पुणे शहरात आणखी दोन रुग्णांचा गुलियन बॅरे सिन्ड्रोम या आजारानं मृत्यू झाला आहे. या आजारानं आता पर्यंत 11 जणांचा मृत्यू झाला आहे. राज्यात आतापर्यंत 211 जणांना जीबीएसचं निदान झालं आहे.

**<><><><><>**

मुंबईत आज सकाळी कल्याण-दादर लोकलमध्ये एका व्यक्तीनं तीन प्रवाशांवर चाकूहल्ला केला. इतर प्रवाशांनी डोंबिवलीत त्याला पकडून पोलिसांच्या स्वाधिन केलं.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यातल्या पोयारकोठी आणि मरकनार इथल्या गावकऱ्यांनी नक्षलवाद्यांना गावबंदी करायचा ठराव पारीत केला आहे. तसंच पोयारकोठीच्या गावकऱ्यांनी दोन भरमार बंदुका पोलिसांकडे सुपूर्द केल्या आहेत.

**<><><><><>**

शक्तीपीठ महामार्गाला विरोध दर्शवण्यासाठी कोल्हापुरात आज १२ जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांची एकत्र बैठक झाली. शक्तीपीठ महामार्ग रद्द करावा या मागणीसाठी १२ मार्चला विधानसभा अधिवेशनादरम्यान विधान भवनावर मोर्चा काढण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. निवडणुकांपूर्वी हा महामार्ग रद्द करण्याची महायुतीच्या नेत्यांची भाषा निवडणुकीनंतर बदलल्याची टीका आमदार सतेज पाटील यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

रत्नागिरी तालुक्यातल्या राई बंदरात महिला प्रभाग संघातर्फे चालवल्या जाणाऱ्या देशातल्या पहिल्या हाऊसबोटचं लोकार्पण आज झालं. उद्योगमंत्री आणि रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यावेळी उपस्थित होते. कोतवडे इथल्या एकता महिला प्रभाग संघातर्फे चालवली जाणार आहे. महिलांनी हाऊसबोट चालवण्याचं प्रशिक्षण घ्यावं, असं उदय सामंत यावेळी म्हणाले. या हाऊसबोटीमधे पर्यटकांसाठी अत्याधुनिक स्वरुपाचे दोन शयनकक्ष, डेक अशी सुविधा आहे. तसंच स्थानिक खाद्यसंस्कृती, लोककलांचा आस्वादही या बोटीवर घेता येणार आहे.

**<><><><><>**

राज्य सरकारचे कर्मचारी आणि निवृत्तीवेतन धारकांना जीपीएफ म्हणजेच भविष्य निर्वाह निधी खात्यातली शिल्लक आणि इतर तपशील आता ऑनलाइन पाहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रधान महालेखापाल कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर ही सुविधा उपलब्ध असल्याची माहिती प्रधान महालेखापाल जया भगत यांनी दिली.

**<><><><><>**

मराठी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांचं पोंभुर्ले इथे स्मारक होण्याच्या दृष्टिने प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांनी दिली. जांभेकर यांच्या २१३व्या जयंती निमित्त आज सिंधुदुर्ग जिल्ह्यात पोंभुर्ले इथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

**<><><><><>**

आयसीसी चँपियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज दुबईत सुरु असलेल्या सामन्यात बांगला देशानं भारतापुढं विजयासाठी २२९ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे.

बांगला देशानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. मात्र त्यांची सुरुवात खराब झाली. ९व्या षटकात ५ बाद ३५, अशी त्यांची स्थिती झाली. मात्र त्यानंतर तोव्हिद हृदोय आणि जाकीर अली यांनी डाव सावरला. त्यांनी सहाव्या गड्यासाठी १५४ धावांची भागिदारी केली. तोव्हीदनं शतक झळकावलं, तर जाकीरनं ६८ धावा केल्या. मात्र इतर फलंदाजांना चांगली कामगिरी करता आली नाही. त्यामुळे त्यांचा डाव दोन चेंडू बाकी असताना २२८ धावांवर संपला. भारतातर्फे शमीनं ५, हर्षित राणानं ३, तर अक्षर पटेलनं २ गडी बाद केले.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या ७ षटकात बिनबाद ३९ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//